Tel No. : (022) -2363 2343
Fax No. : (022) -2363 3272 / 2363 6818
Website : rajbhavan-maharashtra.gov.in
Email : secy.rb-mh@nic.in
cgh.rb-mh@nic.in

सत्यमेव जयते

Raj Bhavan Secretariat
**राजभवन सचिवालय**
Walkeshwar Road, Malabar Hill,Mumbai :- 400 035
वाळकेश्वर मार्ग, मलबार हिल, मुंबई : - ४०००३५
**MAHARASHTRA महाराष्ट्र**

**रा.स.का./मतनिस/२०२०/** ९८३

दिनांक : २५/०१/२०२१

**विषय:** राजभवनातील महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक छळवणूकीच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी अंतर्गत समितीची पुनर्रचना करण्याबाबत....

**संदर्भ:**
१) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्रमांक एसआरव्ही-१००३/३६/ प्र.क्र.६/मकअ, दिनांक ०५/०१/२००४
२) कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३
३) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्रमांक मकचौ- २००६/प्र.क्र.१५/मकक, दिनांक १९/०९/२००६
४) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्रमांक मकचौ- २०१३/प्र.क्र.६३/मकक, दिनांक १९/०९/२०१४
५) कार्यालयीन आदेश क्रमांक रासका /मतनिस/२०१९/५१० दिनांक १८/०२/२०१९

**प्रस्तावना:**

कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी, मा. सर्वोच्च न्यायालयाने विशाखा जजमेंट मधील मार्गदर्शक तत्वे शासनावर बंधनकारक केली आहेत. विशाखा जजमेंट मधील मार्गदर्शक तत्वानुसार, सुधारित महिला तक्रार निवारण समित्या गठीत करण्याच्या सूचना, महिला व बाल विकास विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्रमांक ३ व ४ च्या शासन निर्णयांन्वये देण्यात आल्या आहेत.

उपरोक्त संदर्भ क्रमांक ५ च्या दिनांक १८/०२/२०१९ च्या कार्यालयीन आदेशान्वये, मा. राज्यपालांचे सचिव कार्यालय व परिवार प्रबंधक कार्यालय यांसाठी महिला तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली होती. तथापि, सदर समितीमधील "अध्यक्ष" पदावरील अधिकाऱ्याचा या कार्यालयातील प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्यामुळे, त्यांची सेवा मूळ विभागाकडे प्रत्यावर्तीत करण्यात आली आहे व अन्य "सदस्य" या पदांवरील एक अधिकारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत व अन्य अधिकारी यांची पदोन्नती झाली आहे.

त्यामुळे, सदर समितीची पुनर्रचना करण्याची बाब या कार्यालयाच्या विचाराधीन होती.

**कार्यालयीन आदेश:**

शासकीय सेवेतील महिला कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळवणूकीस प्रतिबंध करण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार व महिला व बाल विकास विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्रमांक ४ येथील १९/०६/२०१४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार, राजभवन कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांकडून आलेल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी संदर्भाधीन क्रमांक ५ येथील दिनांक १८/०२/२०१९ च्या कार्यालयीन आदेशान्वये स्थापन करण्यात आलेल्या समितीची खालील प्रमाणे पुनर्रचना करण्यात येत आहे:

| अ.क्र. | अधिकारी/ अशासकीय सदस्य यांचे नाव/ पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १ | श्रीमती प्राची जांभेकर, उपसचिव (प्रशासन, शिक्षण) | अध्यक्षा |
| २ | श्रीमती स्नेहा खांडेकर,<br>समन्वयक सावित्रीबाई फुले स्त्री संसाधन केंद्र, मुंबई | अशासकीय सदस्य |
| ३ | श्री. जयराज चौधरी,अवर सचिव (प्रशासन) | सदस्य |
| ४ | श्री. रमेश कृ. येवले, उद्यान अधीक्षक व प्रभारी अधिकारी<br>(राजभवन- पुणे, नागपूर, महाबळेश्वर) | सदस्य |
| ५ | श्रीमती लता मेहता, लेखा अधिकारी | सदस्य |
| ६ | श्रीमती प्रांजली आंब्रे | सदस्य सचिव |
| ७. | श्रीमती हर्षिका गजभिये, | सदस्य |
| ८ | श्रीमती करुणा वावडणकर | सदस्य |

प्रस्तुत समितीची कार्यकक्षा पूर्वीप्रमाणेच राहील.

**(संतोष कुमार)**
**मा. राज्यपालांचे प्रधान सचिव**

प्रतः

१. श्री. राकेश नैथानी, मा. राज्यपालांचे विशेष सचिव आणि विशेष कार्य अधिकारी
२. श्रीमती प्राची जांभेकर, मा. राज्यपालांच्या उप सचिव (शिक्षण व प्रशासन)
३. श्री. बादल कुमार, मा.राज्यपालांचे परिवार प्रबंधक
४. श्रीमती स्नेहा खांडेकर, समन्वयक सावित्रीबाई फुले स्त्री संसाधन केंद्र, मुंबई
५. श्री. जयराज चौधरी, अवर सचिव (प्रशासन)
६. श्री. रमेश येवले, उद्यान अधीक्षक व प्रभारी अधिकारी (राजभवन-पुणे,नागपूर, महाबळेश्वर)
७. श्रीमती लता मेहता, लेखा अधिकारी
८. श्रीमती प्रांजली आंब्रे, सदस्य सचिव
९. श्रीमती हर्षिका गजभिये, सदस्य
१०. श्रीमती करुणा वावडणकर, सदस्य
११. राजभवनातील सर्व अधिकारी/कर्मचारी

प्रत माहितीसाठी रवानाः

१) अवर सचिव, महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२) अवर सचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,(**२०-अ**),मंत्रालय, मुंबई ३२.